यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.

पंचशील व निळे झेंडे घेऊन मोठ्या छत्रपती शिवाजी महाराज व

# वडूज येथे नवीन सेरेब्रल पाल्सी सेंटरचे उद्घाटन

**सातारा/प्रतिनिधी : -**

फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दहा वर्षांपासून सातारा जिल्ह्यात सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी वैद्यकीय व सामाजिक सेवा प्रदान केली जात आहे. या उपक्रमाची सुरुवात व्हीलचेअर, कमोड चेअर, मॉडिफाइड चेअर यांचे वाटप करून झाली. मात्र, केवळ एकदाच मदत न करता या आजाराच्या समूळ निर्मूलनासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे, असा विश्वास फाउंडेशनच्या विश्वस्त सौ. रितू छाब्रिया यांनी व्यक्त केला आहे.

या दृष्टिकोनातून जिल्हा परिषदेच्या सर्व शिक्षा अभियानाच्या सहकार्याने अर्ली इंटरव्हेन्शन उपक्रम राबवण्यात येत आहे. आशा आणि अंगणवाडी सेविकांना यासंदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. सातारा, वाई, पाटण, पाचगणी, तारळे आणि खंडाळा येथे आधीच सीपी सेंटर सुरू असून, या सेंटरमध्ये संचेती हॉस्पिटल, भारती हॉस्पिटल, नवले हॉस्पिटल (पुणे) आणि कृष्णा हॉस्पिटल (कराड) येथील तज्ज्ञ डॉक्टरांकडून फिजिओथेरपी व स्पीच थेरपी दिली जाते.

याच उपक्रमाचा पुढचा टप्पा म्हणून खटाव व माण तालुक्यांतील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी वडूज येथील जिल्हा परिषद शाळा क्र. १ येथे नवीन सीपी सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.



या कार्यक्रमास खटाव तालुक्याच्या शिक्षणाधिकारी सौ. विभुते मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी सौ. गायकवाड मॅडम, सर्व शिक्षा अभियानाचे तालुका समन्वयक श्री. अजित गुंड, श्री. राऊत सर व सौ. राऊत मॅडम उपस्थित होते. तसेच फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे वितरक विजय जगदाळे, मनीष शेठ, श्री. अग्रवाल, अभिषेक चौगुले, वैभव कुलकर्णी आणि मुकुल माधव फाउंडेशनचे संतोष शेलार यांचीही उपस्थिती लाभली. कृष्णा हॉस्पिटल, कराड येथील डॉ. नम्रता कदम आणि त्यांच्या फिजिओथेरपी टीमने देखील या उद्घाटनप्रसंगी सहभाग घेतला.

वडूज येथे हे केंद्र सुरू झाल्यामुळे खटाव व माण तालुक्यांतील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांचे पालक अत्यंत आनंदित झाले आहेत. ही सेवा आमच्यासाठी मोठा आधार ठरेल, अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या. तसेच, फिनोलेक्स आणि मुकुल माधव फाउंडेशनकडून सातत्याने केले जाणारे समाजोपयोगी कार्य ही कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

## दत्तात्रय मोहिते